गृह निर्माण विभागामार्फत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणा-या शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेतील पात्रता निश्चीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग,उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक: इबांका २०१७/प्र.क्र. ३६० / कामगार ७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ४ जुलै, २०१९

वाचा-

१) शासन निर्णय गृहनिर्माण विभाग क्र.प्रआयो-२०१५/प्र.क्र.१०८/गृनिधो-२, दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८.
२) शासन निर्णय उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्र. इबांका २०१७/प्र.क्र. ३६०/ काम- ७ दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८.

प्रस्तावना:-

देशातील प्रत्येक कुटुंबाला हक्काचे घर उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने केंद्र सरकारने जून, २०१५ मध्ये सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन गृह निर्माण विभागामार्फत दिनांक ०९ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात प्रधानमंत्री आवास योजना कार्यन्वित करण्यात आली आहे. सदर योजनेची व्याप्ती वाढवून त्यात राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील बांधकाम कामगारांचा समावेश करुन संदर्भ क्र. ०१ येथील दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये शहरी भागासाठी महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना जाहीर करण्यात आली आहे. तसेच, संदर्भ क्र. ०२ येथील दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये लाभार्थ्याच्या अटी व शर्ती निश्चीत करण्यात आल्या आहेत.

२. उक्त योजनेचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगार हा महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे सलग एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी नोंदणीकृत असण्याची अट संदर्भ क्र. ०२ येथील दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये घालण्यात आली आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी सदर अटीत बदल करुन बांधकाम कामगाराच्या नोंदणीचा दिनांक निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) या योजनेच्या लाभ घेण्याकरिता दिनांक ३१ मे, २०१९ रोजी व त्यापूर्वी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांना या योजनेत अर्ज करता येईल.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून,त्याचा संगणक संकेतांक २०१९०७०४१२४९३३०२१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

SHASHANK MADHAV SATHE

Digitally signed by SHASHANK MADHAV SATHE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=6b4e6443f4621997398029547f71977c2d89e32e391d622c519f39893078c30b, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=11a06bf85893554ac5cded657c0f1435af29a0ad118fb759493176e40002b178, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR , o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHASHANK MADHAV SATHE
Date: 2019.07.04 12:53:12 +05'30'

(श. मा. साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य
४. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
५. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
६. मा. अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
७. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा) यांचे खाजगी सचिव.
८. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
९. सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग.
१०. अ.मु.स. (गृह निर्माण विभाग) यांचे स्वीय सहाय्यक.
११. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.
१२. मंडळाचे इतर सर्व सदस्य (व्दारा कामगार आयुक्त)
१३. कामगार आयुक्त, मुंबई / अतिरिक्त कामगार आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर.
१४. उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद.
१५. सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
१६. महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
१७. महालेखापाल-२ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), नागपूर.
१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१९. निवडनस्ती (कामगार-७).